क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/ 15101
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दिनांक : 11 MAY 2011

# परिपत्रक

**विषय :** महाराष्ट्र राज्यातील माजी सैनीकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळास सुरक्षा रक्षक पुरविण्याची कामे प्राधान्याने उपलब्ध करून देण्याबाबत.

**संदर्भ :** प्रशासकीय परिपत्रक क्र.३०३ दिनांक २६.०७.२०१०.

.....

प्रशासकीय परिपत्रक क्र.३०३ दि.२६.०७.२०१० अन्वये महावितरण कंपनीच्या कार्यालयाकरिता बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्तीकरिता मंजूर पदांच्या अधीन राहून जेंव्हा जेंव्हा सुरक्षा रक्षक ही पदे भरावी लागतील तेंव्हा तेंव्हा महाराष्ट्र शासनाचा निर्णय क्र.मासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८ दिनांक १४ नोव्हेंबर, २००२ अन्वये दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करून महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फतच अशी पदे भरण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. परंतु असे निदर्शनास आले आहे की, काही ठिकाणी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाने सुरक्षा रक्षक पुरविण्यास असमर्थता दर्शविली आहे.

२. कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करण्याकरिता सुरक्षा रक्षकांची आवश्यकता असून कंपनीने बाह्य स्त्रोताद्वारे सुरक्षा रक्षक घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला असल्यामुळे बाह्य कंपनीकडून सुरक्षा रक्षक घेणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाने सुरक्षा रक्षक पुरविण्यास लेखी स्वरुपात असमर्थतता दर्शविली आहे अशा ठिकाणी इतर खाजगी अभिकरणातून सुरक्षा रक्षक घेण्यास हरकत नाही.

३. तथापि, खाजगी अभिकरणातून सुरक्षा रक्षक घेताना पुर्वीप्रमाणेच निविदा पद्धतीचा अवलंब करावा व सर्व निर्देशांचे पालन करावे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेट या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*(विजय भि. बागुल)*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*D:\O&M\Adm.Cir - F.N.348-Ex.Serviceman-Security.doc*
*11/05/11*